महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७९७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा. क्र : तंशिविकापु/विवि-४/संकीर्ण/२०२२/ 101

दिनांक : 07 JAN 2022

**महत्वाचे/ तात्काळ**

प्रति,
प्राचार्य,
पदविका अभ्यासक्रमाच्या सर्व संस्था.
पुणे विभाग, पुणे.

**विषय : AISHE- २०२०-२१ कार्यक्रमाअंतर्गत माहिती अपलोड कारण्याबाबत.**

संदर्भ- १. क्र.उशिसं/सांख्यिकी/एआयएसएचई/२०२१-२२/१३७८९ दि.२६.११.२०२१
२. तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र.क्र.०३/तंशिसं/आयटीसेल/एआयएसएचई/२०२१-२२/६८ दि.०८.१२.२०२१

उपरोक्त विषयास अनुसरून संदर्भिय पत्रांच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व नवीन/ जुन्या पदविका संस्थांनी अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रमाच्या वेबपोर्टलवर नोंदणी (रजिस्ट्रेशन) केलेले नाही. अशा सर्व पदविका संस्थांनी सन २०२०-२१ करिता अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम (**AISHE**) या वेबपोर्टलवर त्वरीत रजिस्ट्रेशन करून घेणे आवश्यक आहे. सन २०२०-२१ करिता रजिस्ट्रेशन/ नोंदणी करिता **AISHE** वेबपोर्टल दि.०१.१२.२०२१ पासून सुरू झाले आहे. तरी सर्व संस्थांनी नोंदणी व डीसीएफ-३ दिनांक २० जानेवारी २०२२ पर्यंत अपलोड करावयाचे आहे.

संबंधीत संस्थांनी www.aishe.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करण्यासंबंधी कार्यवाही पूर्ण करावी. ज्या संस्थांना याबाबत अडचणी येतील त्यांनी सांख्यिकी शाखा, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१ दूरध्वनी क्र.(०२०) ६५००११७३/६५००१०१६ येथे प्रत्यक्ष भेट देवून किंवा दूरध्वनीवर संपर्क साधून अडचणीचे निराकरण करून घ्यावे.

**AISHE** ची माहिती www.aishe.gov.in या संकेत स्थळावर नोंदणी न केल्यामुळे संस्था किंवा विद्यार्थी यांना शासकीय योजने पासून वंचित रहावे लागल्यास त्यासाठी सर्वस्वी संस्थेस जबाबदार धरण्यात येईल. तसेच **AISHE** पोर्टलवर नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र गुणवत्ता यादी सोबत सादर करणे बंधनकारक असून, ज्या संस्था **AISHE** नोंदणी प्रमाणपत्र सादर करणार नाहीत अशा संस्थांच्या गुणवत्ता यादीस मान्यता दिली जाणार नाही याची सर्व संस्था प्रमुखांनी गांभिर्याने नोंद घ्यावी.

सोबत - वरील प्रमाणे.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

# तंत्रशिक्षणसंचालनालय, महाराष्ट्रराज्य

३, महानगरपालिकामार्ग, पत्रपेटीक्रमांक1967,मुबई4000 001.

दुरध्वनी– 22620601/22690602/22641150/22641151फॅक्स् – 2269 2102.

E-MAIL :desk3 @dtemaharashtra.gov.in Internet : http://www.dtemaharashtra.gov.in


तात्काळ -इमेल द्वारे

क्र.०३/तंशिसं/आयटीसेल/एआयएसएचई/२०२१-२२/ ६८ दिनांक :-०८-१२-२०२१

प्रती,

सहसंचालक,

विभागीय कार्यालय,

मुंबई,पुणे,नाशिक,अमरावती,औरंगाबाद,नागपूर

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे.
05 JAN 2022
आवक क्र....986......

विषय – **AISHE-2020-21** कार्यक्रमांतर्गत माहिती अपलोड करण्याबाबत.

संदर्भ –क्र उशिसं/सांख्यिकी/एआयएसएचई/२०२१-२२/१३७८९दि.२६ नोव्हेंबर २०२१

आपल्या विभागीय कार्यालयाअंतर्गत येणा-या ज्या नवीन /जुन्या पदविका संस्थांनी अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रमाच्या वेबपोर्टलवर नोंदणी (रजिस्टेशन) केलेली नाही अशा सर्व पदविका संस्थांनी सन २०२०-२१ करिता अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम (AISHE) यावेबपोर्टलवर त्वरीत रजिस्टेशन करुन घेणे आवश्यक आहे. सन २०२०-२१ करीता रजिस्टेशन / नोंदणीकरिता AISHE वेबपोटलवर दि. ०१-१२-२०२१ पासून सुरु झाले आहे. तरी सर्व संस्थांनी नोंदणी व डीसीएफ-3 दिनांक १४ फेब्रुवारी २०२२ पर्यंत अपलोड करावयाचे आहे.

संबंधीत संस्थांनी www.aishe.gov.inया संकेतस्थळावर नोंदणी करण्या संबंधी कार्यवाही पूर्ण करावी. ज्या संस्थांना याबाबत अडचणी येतील त्यांनी सांख्यिकी शाखा,उच्च् शिक्षण संचालनालय, महाराष्टराज्य,पुणे - 411001 दूरध्वनीक्र. (020) 65001173/65001016 येथे प्रत्यक्ष भेट देवून किवा दूरध्वनीवर संपर्क साधून अडचणीचे निराकरण करून घ्यावे.

**AISHE** ची माहितीwww.aishe.gov.inया संकेत स्थळावर नोंदणी न केल्यामुळे संस्था किंवा विद्यार्थी यांना शासकीय योजने पासून वंचित रहावे लागल्यास त्यासाठी सर्वस्वी संस्थेस जबाबदार धरण्यात येईल यांची सर्व संस्थांना माहिती करुन देण्यात यावी.

आपल्या विभागीय कार्यालया अंतर्गत येणा-या सर्व पदविका संस्थांना याचेबाबत तत्परतेने कार्यवाही करण्याच्या सुचना देण्यात याव्यात.

(प्रमोद नाईक)

सहसंचालक

तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्रराज्य,मुंबई